# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

सायंकाळ

**(पोलीस वार्तापत्र)**

---

**दिनांक ०२.१०.२०२५ गुरूवार**

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे नंदनवन :— हद्दपार ईसमास अटक.**

दिनांक ०२.१०.२०२५ चे १४.३५ वा. चे सुमारास, नंदनवन पोलीसांचे तपास पथक हे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, प्लॉट नं. ८, रमना मारोती रोड, उड्डानपुला जवळ, नागपूर येथे एक ईसम पोलीसांना पाहुन पळु लागला. त्यास पाठलाग करून ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव अमोल हिम्मतराव वानखेडे वय ३९ वर्ष रा. रमना मारोती रोड, दिघोरी उड्डानपुला जवळ, नंदनवन, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परीमंडळ क्र. ०४ यांचे हद्दपार आदेश क्र. ०१/२०२५ दि. ३१.०१.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षा करीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे नंदनवन येथे आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे कळमणा :— जिवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपींना अटक.**

दिनांक ०१.१०.२०२५ चे २३.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी सागर रमेश चौधरी वय २५ वर्ष रा. शिवशंभू नगर, भरतवाडा, कळमणा, नागपूर हे त्यांचे मित्रा सोबत भरतवाडा चौक येथे चहा पित असता फिर्यादीचा एक परीचित मित्र जित याचे त्याचे मित्रा सोबत भांडण सुरू होते फिर्यादी यांनी समजविल्याने त्यांचेत समेट होवून ते तेथुन निघून गेले. फिर्यादी हे नवकन्या नगर येथे जेवन करून दि. ०२.१०.२०२५ चे ०१.३० वा. चे सुमारास घरी जात असता जाम नगर, भरतवाडा रोड, नागपूर येथे जित व त्याचे मित्रामध्ये पुन्हा वाद सुरू असल्याचे दिसल्याने फिर्यादी हे मध्यस्ती करण्यास गेले असता आरोपी क्र. १) प्रतीक राजेन्द्र सेलोकर वय २१ वर्ष २) अमन जगदीश मानकर वय २१ वर्ष ३) अंश भानूसे वय २३ वर्ष ४) ओम मेश्राम वय २३ वर्ष यांनी संगणमत करून आरोपी क्र. १ याने चाकूने मारले असता फिर्यादीने हाताने अडविल्याने बोटावर लागले तसेच आरोपी क्र. २ याने फिर्यादीस जिवे ठार मारण्याचे उद्देशाने चाकूने छातीवर मारून जिवे मारण्याचा प्रयत्न केला. दरम्यान तेथे चेतक पेट्रोलींग मोबाईल कळमणा चे अंमलदार हे पोहचल्याने आरोपी तेथुन पळून गेले. पोलीसांनी जखमी फिर्यादी यांना तात्काळ मेयो हॉस्पीटल येथे उपचाराकरीता दाखल केले फिर्यादी यांचा उपचार सुरू आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या बयानावरून पोलीस ठाणे कळमणा येथे पोउपनि. राऊत यांनी आरोपींविरूध्द कलम १०९(१), ३(५) भा.न्या.सं., सहकलम १३५ म.पो.का अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींचा शोध घेवुन आरोपी क्र. १ व २ यांना ताब्यात घेतले आहे ईतर आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे कोराडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक ०१.१०.२०२५ चे २०.३० वा. ते दिनांक ०२.१०.२०२५ चे ०१.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे कोराडी हद्दीत प्लॉट नं. ५४, मोर्या पार्क क्र. १, लोनारा, कोराडी, नागपुर येथे राहणारे फिर्यादी सौरभ कृष्णपदो बसू, वय ४२ वर्षे हे त्यांचे घराला कुलुप लावुन परिवारासह लेडीज क्लब येथे दुर्गापुजा करीता गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे खिडकीचे ग्रिल तोडुन, घरात प्रवेश करून बेडरूम मधील कपाटातील रोख अंदाजे २,०००/— रू. तसेच, सोन्याचे दागिने व एनव्हीआर स्वीच कॅमेरा असा एकुण २,६९,५००/— रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कोराडी येथे मपोउपनि. बडवाईक यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**
**(अंकुश उ. राठोड)**
**पोलीस उप—निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**